दि. ३०.०१.२०१७

# दयानंदच्या सचिन झेटे यांना 'दयानंद श्री' तर अश्विनी पाटील यांना 'दयानंद श्रीमती' पुरस्कार

लातूर - कलेचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दयानंद कला महाविद्यालयाचे वार्षिक स्नेह संमेलन दंगल - २०१७ नुकतेच संपन्न झाले. या स्नेह संमेलनात मागील तीन वर्षात ज्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना या चारही विभागात उल्लेखनिय असे कार्य करणाऱ्या विद्यार्थ्याला गुणवत्तेच्या निकषावर 'दयानंद श्री' व 'दयानंद श्रीमती' असे पुरस्कार घोषित केले जातात.

यावर्षीचा 'दयानंद श्री' हा पुरस्कार सचिन विठ्ठलराव झेटे या विद्यार्थ्याने पटकाविला. त्याने बी.ए. प्रथम वर्षापासून ते बी.ए. तृतीय वर्षापर्यंत महाविद्यालयासाठी अनेक पारितोषके मिळवून दिली आहेत. या वर्षीचा क्रीडा विभागाचा विद्यार्थी प्रतिनिधी म्हणूनही त्याची निवड झाली होती. त्याने हॅण्डबॉल या स्पर्धेसाठी जयपूर येथे संपन्न झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. तसेच ऑल इंडिया आंतर विद्यापीठ शरीर सौष्ठव स्पर्धेमध्ये निवड झाली. त्याचा राष्ट्रीय सेवा योजनेमध्येही सक्रीय सहभाग राहिला आहे. तसेच यावर्षीचा 'दयानंद श्रीमती' पुरस्कार आश्विनी उत्रेश्वर पाटील या विद्यार्थिनीने पटकाविला. आपल्या तीन वर्षाच्या काळात तिने सांस्कृतिक क्षेत्रात अलौकिक कामगिरी केली आहे. तिने आजपर्यंत गायन, समुहगीत, लोकनृत्य, लोकवृंदवादन, पोवाडा अशा विविध कला प्रकारात यश प्राप्त केले आहे. त्याबरोबर राज्य स्तरीय इंद्रधनुष्य व पश्चिम विभागीय युवक महोत्सवामध्ये तिने आपल्या महाविद्यालयाची पताका फडकवत ठेवण्याचे काम केले. त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजनेमध्येही यशस्वी सहभाग नोंदविला आहे.

यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, उपप्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, उपप्राचार्य (क.म.) शिवाजी पाटील, विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रभारी प्रा. डॉ. प्रदीप सूर्यवंशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. संतोष पाटील, क्रीडा विभागाचे प्रमख प्रा. डॉ. नितेश स्वामी, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. बालाजी घुटे, राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे प्रमुख प्रा. विवेक झंपले तसेच शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

---